# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
## वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 06.11.2025** **वार- गुरुवार**

---

**जमीन घोटाळा**

पुण्यातील कथित जमीन गैरव्यवहार प्रकरणी महसूल आणि भूमिअभिलेख विभागाकडून संपूर्ण माहिती मागवली असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितलं. या प्रकरणात चौकशी करून अनियमितता आहे की नाही, हे पडताळून पाहिलं जाईल आणि अनियमितता असेल तर दोषींवर कठोर कारवाई केली जाईल, असं मुख्यमंत्री म्हणाले. ते आज नागपूरात माध्यमांशी संवाद साधत होते. पुण्यातील या कथित जमीन गैरव्यवहार प्रकरणी उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे पुत्र पार्थ पवार यांच्यावर आरोप करण्यात आल्याचं वृत्तसंस्थेच्या बातमीत म्हटलं आहे. या प्रकरणी मुख्यमंत्र्यांनी चौकशीचे निर्देश दिले असून तहसीलदार आणि दुय्यम निबंधकाचं निलंबन करण्यात आलं आहे. या प्रकरणात अतिरिक्त मुख्य सचिव विकास खारगे यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समिती स्थापन करण्यात आली आहे.

**वंदेमातरम**

बंकिमचंद्र चॅटर्जी यांनी लिहिलेल्या वंदे मातरम या गीताला 150 वर्ष पूर्ण होत आहेत. त्यानिमित्त संपूर्ण देशभरात विविध कार्यक्रमांचं आयोजन करण्यात येत आहे. त्याचाच एक भाग म्हणून पुण्यात उद्या संगीत आनंदमठ नाटकाचा प्रयोग सादर होणार आहे. यावेळी वंदे मातरम् ग्रंथाचं प्रकाशन होणार आहे. त्याचबरोबर वंदे मातरम गौरव समितीच्या वतीने पुण्यामध्ये येत्या 8 नोव्हेंबर रोजी वंदे मातरम गौरव यात्रा काढण्यात येणार आहे. या यात्रेमध्ये विविध सामाजिक संस्था, गणेशोत्सव मंडळे तसंच नागरिकांनी मोठ्या संख्येनं सहभागी व्हावं असं आवाहन या संयोजक धीरज घाटे यांनी केलं आहे.

**वंदेमातरम**

युवा पिढीने वंदे मातरम गीतातून प्रेरणा घेऊन राष्ट्रविकासात योगदान द्यावं असं आवाहन लष्कराचे महाराष्ट्र, गुजरात आणि गोवा विभागाचे अतिरिक्त महासंचालक मेजर जनरल संजय प्रताप सिंह विश्वासराव यांनी आज पुण्यात केलं. यशस्वी संस्थेनं चिंचवडच्या हुतात्मा चापेकर स्मारक परिसरात वंदे मातरम सार्ध शताब्दी महोत्सवाचं आयोजन केलं होतं, त्यावेळी ते बोलत होते. यावेळी त्यांनी क्रांतीवीर चापेकर बंधूंच्या सर्वोच्च बलिदानाचं स्मरण केलं. वंदे मातरम गीताचं सामूहिक गायनही यावेळी करण्यात आलं.

**ग्लोबल पुलोत्सव**

समाजाचा विचार करणारे चिंतनशील भाष्यकार, साहित्यिक आणि राजकारणावर परखडपणे भाष्य करणारे पु. ल. देशपांडे; हे महाराष्ट्राच्या सांस्कृतिक पटलावरील महत्त्वाचे घटक आहेत, असे गौरवोद्गार ज्येष्ठ नाटककार सतीश आळेकर यांनी आज पुण्यात काढले. ग्लोबल पुलोत्सवाचं उद्घाटन करताना ते बोलत होते. ज्येष्ठ

व्यंगचित्रकार शि. द. फडणीस यांनी पुलंच्या 75व्या वाढदिवसाच्या निमित्तानं त्यांच्यावर काही व्यंगचित्र रेखाटली होती; या व्यंगचित्रांचं अनावरण करून या महोत्सवाचं उद्घाटन झालं. पुलंच्या बहरूपी कारकिर्दीवर, 1994मध्ये प्रदर्शित झालेला, 'या सम हा' लघुपटही यावेळी दाखवण्यात आला.

**कुष्ठरोगरुग्ण**

राज्य शासनाने 2027 पर्यंत कुष्ठरोगमुक्त महाराष्ट्राचं उद्दिष्ट ठेवलं आहे. त्या पार्श्वभूमीवर राज्यात कुष्ठरोगाचा प्रसार रोखण्यासाठी आणि रुग्णांना वेळेत उपचार मिळावेत, या उद्देशाने राज्य शासनाने कुष्ठरोगाला नोटिफायबल डिसीज म्हणजेच सूचित करण्यायोग्य आजार म्हणून घोषित केलं आहे. कुष्ठरोगाचं निदान झालेल्या रुग्णांची नोंद दोन आठवड्यांच्या आत संबंधित जिल्हा आरोग्य कार्यालय, सहाय्यक संचालक, आरोग्य सेवा, कुष्ठरोग, तसंच स्थानिक नागरी आरोग्य अधिकाऱ्यांकडे करणं आता सर्व डॉक्टर आणि आरोग्य संस्थांसाठी बंधनकारक आहे. यावर्षी सप्टेंबर अखेर राज्यात 7 हजार 863 कुष्ठरुग्णांची नोंद झाली असून उपचाराखालील रुग्णांची संख्या 13 हजार 10 आहे. सर्व वैद्यकीय व्यावसायिकांनी कुष्ठरोग निदान आणि नोंदणीसंबंधीच्या नियमांचं काटेकोर पालन करण्याचं आवाहन आरोग्य विभागानं केलं आहे.

**पिंपरी चिंचवड**

मुंबईच्या म्युझियम ऑफ सोल्युशन्स या संस्थेनं आयोजित केलेल्या राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेत पिंपरी चिंचवड महापालिकेच्या शाळांमधील दोन विद्यार्थ्यांची चित्र निवडण्यात आली आहेत. महापालिकेच्या शाळेतील दिव्या उपर्वट, आणि वेदांत चौघुले यांनी रेखाटलेली ही चित्र आता मुंबईतील म्युझियम ऑफ सोल्युशन्स या नामांकित संग्रहालयात प्रदर्शनासाठी ठेवण्यात येणार आहेत.

**पुणेमनपा**

पुणे महापालिकेतर्फे विश्रांतवाडी, येरवडा परिसरातील मुकुंदराव आंबेडकर चौकात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचं काम लवकरच सुरू होणार आहे. याचा प्रस्ताव तयार करून कायदेशीर आणि प्रशासकीय मान्यता मिळवण्याच्या सूचना अतिरिक्त आयुक्त पृथ्वीराज बी. पी. यांनी संबंधितांना दिल्या आहेत.

**हवामान**

पुणे आणि परिसरात आज कमाल 31 तर किमान 18 पूर्णांक 5 दशांश अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली. उद्याही साधारण असंच तापमान असेल असा पुणे वेधशाळेचा अंदाज आहे.

**तर हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर संध्याकाळी सहा वाजता ताज्या पुणे वृत्तांतमध्ये. नमस्कार.**